| | | | | |
|---|---|---|---|---|
| MHRG080005562015 | दाखल दिनांक | ०७/०७/२०१५ | | |
| | नोंदणी दिनांक | ०७/०७/२०१५ | | |
| | निकाल दिनांक | ०५/०८/२०२६ | | |
| | कालावधी | वर्ष | महिना | दिवस |
| | | ११ | ०० | २९ |

**नियमित फौजदारी खटला क्र. ११०/२०१५** **निशाणी क्र. ५३/ब**

फॉर्म क्र. XXXII

**भाग 'अ'**

Para 44(i) of Chapter VI of Criminal Manual

**खालापुर येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१,**
**खालापुर, जिल्हा रायगड.**
**( पिठासीन अधिकारी : एस.एस.देशमुख )**

पारित दि. ०५/०८/२०२६

**नि.फौ.ख.क्र. ११०/२०१५**

(पहिली खबर क्र. ४५/२०१४)

(भारतीय दंड विधान संहीता कलम ४२० प्रमाणे.

(रसायनी पोलिस स्टेशन)

| | | |
|---|---|---|
| फिर्यादीचे नाव | | **सरकारतर्फे,**<br>रसायनी पोलिस ठाणे, ता. खालापूर जि. रायगड. |
| प्रतिनिधीत्व | | श्री. विलास गवई, सहा. सरकारी अभियोक्ता. |
| आरोपीचे नाव | | **सचिन गणु भोईर,**<br>व.व. ३७, व्यवसाय – नोकरी,<br>रा. दापीवली, ता. पनवेल, जि. रायगड. |
| प्रतिनिधीत्व | | श्री. अभिषेक पाटील, आरोपीतर्फे विधिज्ञ. |

**भाग 'ब'**

Para 44(i) of Chapter VI of Criminal Manual

| | |
|---|---|
| अपराध घडल्याचा दिनांक | जानेवारी २०१३ ते १५/०४/२०१४ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याचा दिनांक | ०७/०७/२०१५ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | १९/०८/२०१६ |
| पहिला साक्षीदार तपासल्याचा दिनांक | २४/०७/२०१७ |
| शेवटचा साक्षीदार तपासल्याचा दिनांक | ०५/०२/२०२६ |
| निकाल देण्यासाठी दिल्याचा दिनांक | ०५/०८/२०२६ |
| निकाल दिनांक | ०५/०८/२०२६ |
| शिक्षा दिल्याचा आदेश दिनांक (असेल तर) | -- |

## <u>आरोपीचा तपशिल</u>

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | आरोपीस अटक केल्याचा दिनांक | आरोपीस जामीन दिल्याचा दिनांक | दोषारोप | निर्दोष /दोषी | किती शिक्षा सुनविण्यात आली | चौकशी दरम्यान तुरुंगात गेल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सचिन गणु भोईर | १८/०७/२०१४ | ०७/०७/२०१५ | भारतीय दंड विधान संहीता कलम ४२० प्रमाणे. | निर्दोष | -- | -- |

## भाग 'क'

Para 44(i) of Chapter VI of Criminal Manual

**अभियोगपक्ष /बचावपक्ष/ न्यायालयाचे साक्षीदारांची यादी**

**अ. अभियोगपक्षः**

| अ.क्र. | नाव | निशाणी क्रमांक | पुराव्याचा प्रकार (प्रत्यक्षदर्शी, पोलिस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैद्यकीय अधिकारी, पंच इतर साक्षीदार ) |
|---|---|---|---|
| १. | अहमद हुसेन शेख | २१ | फिर्यादी |
| २. | मुमताज अहमद शेख | ३० | साक्षीदार |
| ३. | बिपीन देवराम पाटील | ३४ | बँकेचे कर्मचारी |
| ४. | प्रकाश श्रीधर राणे | ४८ | तपासीक अंमलदार |

**ब. बचावपक्ष** (असेल तर)

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार (प्रत्यक्षदर्शी, पोलिस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैद्यकीय अधिकारी, पंच इतर साक्षीदार ) |
|---|---|---|
| | -- | -- |

**क. न्यायालयाचे साक्षीदार** (असेल तर)

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार (प्रत्यक्षदर्शी, पोलिस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैद्यकीय अधिकारी, पंच इतर साक्षीदार ) |
|---|---|---|
| | -- | -- |

**अभियोगपक्ष /बचावपक्ष / न्यायालयाचे साक्षीदारांनी सिद्ध केलेल्या कागदपत्रांची यादी**

**अ. अभियोगपक्ष**

| अ. क्र. | निशाणी क्र. | तपशिल |
|---|---|---|
| १. | २२ | फिर्याद |
| २. | ३५ | बँक खात्याबाबतची माहिती असणारे प्रमाणपत्र |

| | | |
|---|---|---|
| ३. | ३६ | खाते उतारा |
| ४. | ४९ | प्रथम खबरी अहवाल |
| ५. | ५० | बँकेतुन गुन्ह्याचे कागदपत्र मिळणेकामी दिलेले पत्र |
| ६. | ५१ | बँकेचा खाते उतारा |

**ब. बचावपक्षः**

| अ.क्र. | निशाणी क्र. | तपशिल |
|---|---|---|
| | –– | –– |

**क. न्यायालयाच्या निशाणीः**

| अ.क्र. | निशाणी क्र. | तपशिल |
|---|---|---|
| | –– | –– |

**ड. मुद्देमालः**

| अ.क्र. | आर्टीकल क्र. | तपशिल |
|---|---|---|
| | –– | –– |

## न्यायनिर्णय

(निकाल तारीख ०५/०८/२०२६)

प्रस्तुतच्या खटल्याअंतर्गत आरोपीने भारतीय दंड विधान संहिता कलम ४२० अन्वये शिक्षेस पात्र असणाऱ्या अपराधांकरीता संपरिक्षा दिलेली आहे.

**अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणेः–**

२. सदरची घटना मौजे रिस, ता. खालापूर, जि. रायगड येथे जानेवारी २०१३ ते दि. १५/०४/२०१४ चे दरम्यान सदरचा गुन्हा घडलेला असून आरोपीने फिर्यादी यांचेकडून वॉटर फिल्टर मशिन विक्रीचे धंद्याकरीता माहे जानेवारी २०१३ मध्ये

रक्कम रु. ४,२८,०००/– रोख रक्कम फिर्यादी यांचे कडुन उसने घेतले होते. त्यानंतर आरोपी याने त्याचे आय.डी.बी.आय. बँकेमधील अकाउंट क्र. ०७८४१०४००००२७०१६ या मध्ये रक्कम नाही हे माहीत असुन देखील फिर्यादी यांना फसविण्याचे उद्दशाने व अप्रमाणीकपणाने फिर्यादी यांना आय.डी.बी.आय. बँकेचे प्रत्येकी एक लाख रुपये रक्कमेचे एकुण ४ चेक नंबर अनुक्रमे क्र. (१) ०२५१२२, (२) ०२५१२३, (३) ०२५१२९ व (४) ०२५१३० असे फिर्यादी यांना दिल्याने त्यांनी सदरचे चेक दि. २१/०२/२०१४ रोजी त्यांचे एक्सीस बँकेतील खाते क्र. ९१३०१००५३८४४४६० या खात्यावर वटविण्यासाठी टाकले असता ते न वटता दि. १५/०४/२०१४ रोजी परत आले म्हणून आरोपी याने त्यांचे आय.डी.बी.आय. बँकेतील त्यांचे खात्यावर रक्कम जमा नाही हे माहित असताना देखील त्या अकाउंटवर फिर्यादी यांना एकुण ४ चेक देवुन त्यांची फसवणूक केली हे सिध्द करणे गरजेचे आहे.

३. घटनेनंतर फिर्यादीने, आरोपीविरुद्ध रसायनी पोलीस ठाणेत फिर्याद दिली. फिर्यादीने दिलेल्या तक्रारीच्या आधारे आरोपीविरूद्ध गुन्हा रजिष्टर क्र. ४५/२०१४ नोंदविण्यात आला व प्रस्तुत प्रकरणाचा तपास तपासीक अंमलदार श्री. पी. एस. राणे (पो.हे.कॉ.) यांचेकडे सोपविणेत आला होता. तपासाकामी त्यांनी साक्षीदारांचे जाब–जबाब नोंदविले, घटनास्थळ पंचनामा केला व तपास पुर्ण झाल्यानंतर आरोपीविरूद्ध दोषारोपत्र दाखल केले.

४. या न्यायालयाने दिनांक १९/०८/२०१६ रोजी आरोपीविरुद्ध भारतीय दंड विधान संहिता कलम ४२० प्रमाणे शिक्षेस पात्र असणाऱ्या अपराधाकरीता दोषारोप (निशाणी क्र.१३) वर ठेवला. सदर दोषारोपातील गुन्ह्याबाबतचा मजकुर आरोपीला त्याच्या भाषेमध्ये समजावुन सांगितला असता आरोपीने सदरचा गुन्हा नाकबूल करुन संपरिक्षेची मागणी केली आहे.

५. आरोपी विरुद्ध त्याने गुन्ह्यात गोवणारा पुरावा पटलावर आल्यामुळे आरोपीची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणेची साक्ष निशाणी क्र.५२ वर

नोंदवण्यात आली.

६. अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील व आरोपीतर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत कामी माझे विचारार्थ खालीलप्रमाणे मुद्दे व त्यावरील निष्कर्ष कारणांसह मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिद्ध केले आहे का की, मौजे रिस, ता. खालापूर, जि. रायगड येथे जानेवारी २०१३ ते दि. १५/०४/२०१४ चे दरम्यान सदरचा गुन्हा घडलेला असून आरोपीने फिर्यादी यांचेकडून वॉटर फिल्टर मशिन विक्रीचे धंद्याकरीता माहे जानेवारी २०१३ मध्ये रक्कम रु. ४,२८,०००/- रोख रक्कम फिर्यादी यांचे कडुन उसने घेतले होते. त्यानंतर आरोपी याने त्याचे आय.डी.बी.आय. बँकेमधील अकाउंट क्र. ०७८४१०४००००२७०१६ या मध्ये रक्कम नाही हे माहीत असुन देखील फिर्यादी यांना फसविण्याचे उद्दशाने व अप्रमाणीकपणाने फिर्यादी यांना आय.डी.बी.आय. बँकेचे प्रत्येकी एक लाख रुपये रक्कमेचे एकुण ४ चेक नंबर अनुक्रमे क्र. (१) ०२५१२२, (२) ०२५१२३, (३) ०२५१२९ व (४) ०२५१३० असे फिर्यादी यांना दिल्याने त्यांनी सदरचे चेक दि. २१/०२/२०१४ रोजी त्यांचे एक्सीस बँकेतील खाते क्र. ९१३०१००५३८४४४६० या खात्यावर वटविण्यासाठी टाकले असता ते न वटता दि. १५/०४/२०१४ रोजी परत आले म्हणून आरोपी याने त्यांचे आय.डी.बी.आय. बँकेतील त्यांचे खात्यावर रक्कम जमा नाही हे माहित असताना देखील त्या अकाउंटवर फिर्यादी यांना एकुण ४ चेक देवुन त्यांची फसवणूक केली व त्याद्वारे त्याची ठकवणुक केली आणि त्यायोगे त्याने **भारतीय दंड विधान संहिता १८६०** चे **कलम ४२०** अन्वये गुन्हा केला ? | **नकारार्थी** |
| २. | आदेश काय ? | **आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ करीताः–**

७. अभियोग पक्षाच्या कथेचा विचार करता, आरोपीविरुद्ध वरील दोषारोप सिद्ध करण्यासाठी जानेवारी २०१३ ते १५/०४/२०१४ या कालावधीत फिर्यादीने विश्वासाने सोपवलेल्या रक्कमेचा आरोपीने अपहार केल्याचे निःसंशयितपणे सिद्ध होणे गरजेचे आहे. त्यासाठी खालील बाबी सिद्ध करणे गरजेचे आहे.

- आरोपीकडे मालमत्ता विश्वासाने सोपविण्यात आलेली होती.
- त्या मालमत्तेचा त्याने अपहार केला किंवा स्वत:च्या उपयोगाकरिता ती वापरली.
- त्याद्वारे त्याने फौजदारी पात्र न्यासभंग करुन ठकवणुक केली.

८. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेला साक्षीदार अहमद हुसेन शेख (अ.सा.क्र.१) हे फिर्यादी असून त्यांच्या सरतपासात असे आले आहे की, आरोपी त्याचा मित्र आहे. घटनेच्या वेळी फिर्यादीचे रिस येथे मटणाचे दुकान होते. जानेवारी २०१३ मध्ये आरोपीला पैश्यांची गरज असल्याने त्याने मागणी केल्यामुळे रोख रक्कम दोन लाख त्याला दिली. त्यानंतर देखील त्याला अजून पैश्यांची गरज होती. त्यामुळे रक्कम रुपये २,२८,०००/– आरोपीला दिले. एकुण रक्कम रुपये ४,२८,०००/– आरोपीला रोख दिली. त्यानंतर डिसेंबर २०१३ मध्ये फिर्यादीच्या मुलाचा सुंताचा कार्यक्रम असल्याने आरोपीस नोव्हेंबर २०१३ मध्ये पैश्याची मागणी केली, त्यावेळी आरोपीने प्रत्येकी १,००,०००/– रकमेचे आय.डी.बी.आय. बँकेचे चार चेक दिले. ते चेक वठण्यासाठी एक्सेस बँकेत जमा केले. ते न वठता परत आल्याचे समजले कारण आरोपीच्या खात्यात पुरेशी रक्कम नव्हती. आरोपी विरुद्ध रक्कम वसुलीसाठी दाखल केलेल्या दाव्यामध्ये मुळ धनादेश दाखल केलेले आहेत. त्यामुळे या प्रकरणात त्या धनादेशाची झेरॉक्स प्रत दाखल केलेली आहे. त्यास आर्टीकल आय ते एल देण्यात आलेले आहे. त्यानंतर सदरची फिर्याद दाखल करण्यात आली ती निशाणी क्र.२२ वर आहे.

९. सदर साक्षीदाराने त्याच्या उलटतपासामध्ये कबूल केले आहे की, त्याच्या व्यवसाय मंगळवार, बुधवार, शुक्रवार व रविवारी जास्त चालतो. तो आता मटण व्यवसाय करत नाही. सदर फिर्यादीस त्याच्या व्यवसाया विषयी त्याचप्रमाणे होणा–या खर्चा विषयी अनेक प्रश्न विचारण्यात आले त्यावर त्याने उत्तरे दिलेली आहेत. आरोपीला दिलेल्या पैश्याबाबत कोणताही करार झाला नाही हे त्याने कबुल केले. आरोपीने त्याला चेक दिले नाही हे नाकारले. फिर्यादीने हे नाकारले की, भिशीच्या पैश्यासाठी आरोपीने त्याच्याकडून रक्कम घेतली होती. आरोपीने त्याच्या धंद्यासाठी भिशी उचलली होती हे नाकारले. आरोपीने भिशीचा हप्ता न दिल्याने त्याला चेक परत दिले नाही हे नाकारले. आरोपी विरुद्ध खोटी केस केल्याचे नाकारले.

१०. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेला साक्षीदार मुमताज अहमद शेख (अ.सा.क्र.२) हे फिर्यादीच्या पत्नी असून त्यांच्या सरतपासात त्यांनी फिर्यादीच्या कथनांना दुजोरा देणारी साक्ष दिलेली आहे. उलटतपासामध्ये सदर साक्षीदाराने कबुल केलेले आहे की, तिचा भाउ कोणत्याही नोकरीला नाही. आरोपीला किती तारखेला पैसे दिले होते ती तारीख जबाब देते वेळी सांगितली होती का हे आठवत नाही. व्यवहाराबाबत कोणताही करार झाला नव्हता. तिचे पती भिशीचा व्यवसाय करत होते हे तिने नाकारले. परंतु सदस्य भिशी व्यवसायातून पैसे उचलत होते हे कबुल केले. त्या भिशीचा मासीक हफ्ता भरला जातो याची तिला माहिती नाही. सदर साक्षीदाराला हे माहिती नाही की, आरोपीने त्याच्या व्यवसायासाठी तिच्या पतीच्या भिशीमधून पैसे उचलले होते. तिचे पती बाहेर आरोपी सोबत किंवा इतर लोकांसोबत काय व्यवहार करतात याची तिला माहिती नाही. वादातील धनादेश भिशीपोटी आरोपीने फिर्यादीकडे जमा केले होते याची तिला माहिती नाही. तिने हे कबुल केले की, तिच्या पतीने धनादेश आरोपीला परत केले नाही. तिचे पती बेकायदेशीर भिशीचा व्यवसाय करतात हे तिने नाकारले. आरोपीचे तिच्या पतीसोबत चांगले संबंध होते म्हणून ती आरोपीला ओळखते. पतीच्या सहानुभूतीपोटी न्यायालयात साक्ष देत असल्याचे तिने कबुल केले.

११. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेला साक्षीदार बिपीन देवराम पाटील

(अ.सा.क्र.३) हे एक्सीस बँक शाखा खोपोली, येथे व्यवस्थापक असून त्यांच्या सरतपासात असे आले आहे की, ते फेब्रुवारी २०२२ पासून खोपोली येथे कार्यरत आहे. फिर्यादीचे बचत खाते पनवेल शाखेमध्ये दहा वर्षांपासून आहे. बँकेतील सर्व संगणक व सर्वर सुस्थितीत आहेत व नियमित वापरातील आहेत. त्यामध्ये काही तांत्रीक बिघाड झाला तरी त्यातील माहिती नष्ट होत नाही. फिर्यादीच्या बँक खात्याबाबत दाखल केलेली माहिती व त्यासोबत जोडलेले प्रमाणपत्र निशाणी क्र.३३ व ३५ वर दाखल केलेले आहेत. त्यातील नोंदी ख–या व बरोबर आहेत. वादातील धनादेश हे धनादेश देणा–याच्या बँक खात्यात पुरेशी रक्कम शिल्लक नसल्याने अनादरीत झालेले आहेत.

१२. सदर साक्षीदाराच्या उलटतपासामध्ये त्याने नाकारले की, सन २०२२ पुर्वी खात्या संदर्भात काय घडले याची त्यांना माहिती नाही. एक्सेस बँकेच्या सर्व शाखांना व्यवस्थापकाची नेमणुक आहे. खातेदार खाते संदर्भातील माहिती आवश्यक असल्यास शाखेमध्ये अर्ज करुन ती माहिती प्राप्त करु शकतो. धनादेशावर कोणाच्या सह्या आहेत हे ते सांगू शकत नाही. दिनांक २४/०२/२०१४ व दिनांक १५/०४/२०१४ रोजीचे धनादेश कोणाच्या खात्यावरुन प्राप्त झाले हे त्यांना सांगता येणार नाही.

१३. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेला साक्षीदार प्रकाश श्रीधर राणे (अ.सा.क्र.४) हे तपासीक अंमलदार असून त्यांच्या सरतपासात असे आले आहे की, सन २०११ ते २०१७ या कालावधीत ते रसायनी पोलिस स्टेशन येथे पोलिस हेडकॉन्टेबल म्हणून कार्यरत होते. दिनांक २०/०६/२०१४ रोजी ठाणे अंमलदार यांनी सदरचा गुन्हा त्यांच्याकडे तपासासाठी दिला. तपासकामी त्यांना प्रथम खबरी अहवाल प्राप्त झाला. त्यानंतर त्यांनी साक्षीदारांची टिपणे त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविली. बॅकेतुन गुन्ह्याचे कागदपत्र मिळणेकामी त्यांनी पत्र दिले होते. आरोपीने फिर्यादीकडून रक्कम रुपये ४,२८,०००/– हात उसणे घेतले होते. परंतु ते पैसे परत न देता त्याने फिर्यादीला धनादेश दिला तो धनादेश वठला नाही त्यामुळे फिर्यादीने सदरची

फिर्याद दाखल केली. आरोपीला पाहिल्यास ते ओळखू शकतात. आरोपी न्यायालयात हजर आहे.

**१४.** सदर साक्षीदाराने त्याच्या उलटतपासामध्ये कबूल केले आहे की, सदरच्या प्रकरणातील गुन्हा कलम १३८ प्रमाणे चेक न वठल्यामुळे दाखल केला होता. सदरचे धनादेश आरोपीने सेक्युरिटी म्हणून फिर्यादीला दिले नव्हते. सदर केसच्याकामी आरोपी व फिर्यादी यांच्यामध्ये पैसे देण्याबाबतचा कोणताही लेखी करार झाल्याचे तपासात दिसून आले नाही. कोणताही व्यवहार रक्कम रुपये २०,०००/– च्या वर असेल तर तो रोख करता येत नाही याची त्यांना माहिती नाही. फिर्यादीकडे आरोपीला देण्यासाठी आलेले पैसे हे कोठून आले याचा त्यांनी तपास केला नाही. धनादेशावरील हस्ताक्षर आरोपीचे असल्याबाबत हस्ताक्षर तज्ञांचा रिपोर्ट त्यांनी मिळविला नाही. फिर्यादीने आरोपीला निगोशियेबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट कलम १३८ प्रमाणे पुर्व सुचना देण्यासासाठी नोटीस दिली नव्हती. आरोपीने फिर्यादीची फसवणूक केलेली नसल्याचे नाकारले आहे. फिर्यादीच्या नातेवाईकांना मराठी लिहिता वाचता येत होते. साक्षीदारांच्या जबाबात त्यांना मराठी लिहिता वाचता येते असे नमूद नाही. फिर्यादीने रक्कमेचे धनादेश आरोपीला दिले नाहीत त्यामुळे ते तपासकामी कागदपत्रे मिळवू शकले नसल्याचे नाकारले आहे. असा कोणताही साक्षीदाराचा जबाब नोंदविला नाही की ज्याच्या समोर आरोपीने फिर्यादीला धनादेश दिले. फिर्यादीच्या पत्नी समोर सदरचा धनादेश आरोपीने फिर्यादीला दिला होता. फिर्यादीचा कोंबडीचा व्यवसाय होता व त्यासाठी तो किती माल घेत होता व त्याला किती उत्पन्न मिळत होते याबाबत त्यांनी तपास केला नाही. जबाब नोंदविण्यात आलेले साक्षीदार हे फिर्यादीचे मित्र व नातेवाईक आहेत. त्यांना तपास करण्याचे लेखी आदेश प्राप्त झाले नाहीत. फिर्यादी पोलिस अधिक्षक यांच्याकडे गेला त्यामुळे गुन्हा घडलेला नसतांना देखील बरकडे यांनी फिर्याद नोंदविली व त्यांनी तपास केल्याचे नाकारले आहे. फिर्यादीचे उत्पन्न एवढे नसतांना फिर्यादी व नातेवाईकांच्या म्हणण्या प्रमाणे खोटी फिर्याद नोंदविली असल्याचे नाकारले आहे. फिर्यादी व आरोपी एका गावातील असल्यामुळे फिर्यादीने आरोपीचा धनादेशाचा

गैर वापर केला असल्याचे नाकारले आहे. वरिष्ठांच्या दबावामुळे त्यांनी चुकीचा तपास केला व आरोपीविरुध्द चुकीचे दोषारोप पत्र दाखल केले असल्याचे नाकारले आहे.

१५. अभिलेखावरील तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुत प्रकरणात ज्या धनादेशावरुन फिर्याद दाखल झालेली आहे ते मुळ धनादेश सदर प्रकरणात दाखल नाहीत. त्याचप्रमाणे तपासी अधिकारी यांनी ते जप्त देखील केलेले नाही. फिर्यादी याने नेगोशिएल इन्स्ट्रुमेंट अॅक्ट कलम १३८ प्रमाणे आरोपी विरुध्द प्रकरण दाखल केले असल्याचे कथन केलेले आहे. परंतु ती प्रकरणे कोणत्या न्यायालयात दाखल आहेत व त्यांचे काय क्रमांक आहेत याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्याचप्रमाणे फिर्यादी व फिर्यादीची पत्नी हे हिंदी भाषिक आहेत. फिर्यादी याचे मटनचे दुकान होते व त्याने कथन केलेले उत्पन्न हे प्रत्येक आठवड्यास १० ते १२ हजार रुपये इतके मिळते असे त्याने कथन केलेले आहे. मुळ धनादेश दाव्यामध्ये दाखल केल्याचे नमूद केलेले आहे परंतु तो दाव्याचा क्रमांक प्रकरणामध्ये नमूद केलेला नाही. फिर्यादीच्या पत्नीशिवाय इतर कोणताही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार सदर व्यवहारास नाही.

१६. फिर्यादीच्या पत्नीने तिच्या पतीच्या भिशीच्या व्यवसायातून सदस्य पैसे उचलत होते असे कबूल केलेले आहे. त्यामुळे सदरचा व्यवहार हा कायदेशीर देण्यापोटी झालेला आहे किंवा नाही याबाबत साशंकता निर्माण होते. त्याचप्रमाणे फिर्यादीची रु. ४,२८,०००/- आरोपीला देण्याची ऐपत होती किंवा नाही ही बाब देखील सिध्द झालेली नाही. ज्या धनादेशावर प्रस्तुतचे प्रकरण अवलंबून आहे ते धनादेश अभिलेखावर दाखल नाहीत. साक्षीदार क्र. ३ हे अॅक्सीस बॅंकेचे माहितगार इसम असून त्यांनी खाते उतारा निशाणी ३६ दाखल केलेला आहे. त्यामध्ये वादातील धनादेश अनादरीत झाल्याचा व्यवहार दिसत आहे परंतु सदरचा व्यवहार हा फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये हात उसणे दिलेल्या रक्कमेसाठी करण्यात आला होता ही बाब सिध्द झालेली नाही. त्याचप्रमाणे भारतीय दंड विधान संहीता कलम ४२० मधील तरतुदीचे अवलोकन केले असता सुरुवातीपासून फसवणूक करण्याच्या हेतुने केलेली कृती ही

त्या कलमाखाली येते. परंतु आरोपीने फिर्यादीस धनादेश दिलेले आहेत. ते धनादेश आर्थिक देण्याकरीता दिलेले आहेत. यावरुन आरोपीचा फिर्यादीला फसविण्याचा उद्देश होता हे सिध्द होत नाही. मुळ धनादेश अभिलेखावर का दाखल केलेले नाही त्याचप्रमाणे ते धनादेश भिशीच्या पैशापोटी सिक्युरीटी म्हणून घेतलेले आहेत किंवा कसे ही बाब देखील सिध्द झालेली नाही. अशा परिस्थितीत संशयाचा फायदा आरोपीला देणे उचित होणार आहे.

**१७.** फौजदारी कायद्यातील तत्वानुसार आरोपीवरील दोषारोप वाजवी शंकेपलीकडे जाऊन सिद्ध होणे गरजेचे आहे. परंतु आरोपीला सिद्धदोषी ठरविण्यासाठी आवश्यक असलेला कागदोपत्री अथवा तोंडी पुरावा पटलावर आलेला नाही. त्यामुळे आरोपीने फिर्यादीची रोख रक्कम त्याला परत न करण्याच्या उद्देशाने त्याची ठकवणुक केली ही बाब वाजवी शंकेपलीकडे जाऊन सिद्ध झालेली नाही. सबब आरोपीला सिद्धदोषी ठरविता येणार नाही. त्यामुळे, मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष ''नकारार्थी'' नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करीताः–</u>**

**१८.** उपरोक्त मुद्दा क्र.१ करिता केलेल्या सविस्तर कारणमिमांसेच्या अनुषंगाने आरोपीविरुद्ध भारतीय दंड विधान संहिता कलम ४२० अन्वये शिक्षेस पात्र असणारा अपराध वाजवी शंकेपलीकडे जाऊन सिद्ध झालेला नाही, त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | आरोपी नामे **सचिन गणु भोईर** यास भारतीय दंड विधान संहिता कलम ४२० अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्याच्या अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| २. | आरोपीचा जामीन कदबा रद्द करण्यात येत आहेत. |

| | |
|---|---|
| ३. | आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७–अ अन्वये रक्कम रु.१५,०००/– (रुपये पंधरा हजार फक्त) चे वैयक्तीक बंधपत्र व त्याच रक्कमेचा जात मुचलका सादर करावा. |

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला.)**

SANYOGITA SUBHASHRAO DESHMUKH
Digitally signed by SANYOGITA SUBHASHRAO DESHMUKH
Date: 2026.08.05 18:05:09 +0530

**(एस. एस. देशमुख )**

स्थळ – खालापुर. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
दिनांक – ०५/०८/२०२६ न्यायालय क्र.१, खालापुर.

**Certificate**

I affirm that, the contents of the P.D.F. file order are same word to word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Court Name | : | Smt. S. S. Deshmukh<br>CJJD & JMFC, Khalapur |
| Name of Steno | : | Shri. Rakesh S. Patil<br>Stenographer, Grade – III |
| Date of Order | : | 05/08/2026 |
| Order signed by P. O. On | : | 05/08/2026 |
| Date of PDF & Order uploaded on | : | 05/08/2026 |